# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि भारत मौसम विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने)**

फोन नं.: (०२३५८) २८२३८७ ई-मेल: dpl.amfu@gmail.com

**अंक ०५/२०२१** **दिनांक १५/०१/२०२१** **कालावधी ५ दिवस**


| | | |
|---|---|---|
| **डॉ. प्रशांत बोडके,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०९/०१/२०२१ ते १५/०१/२०२१) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १६/०१/२०२१ सकाळी ८:३० पासून २०/०१/२०२१ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (स्त्रोत: कृषि हवामान वेधशाळा, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत) | | | | | | | | (स्त्रोत: प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई) | | | | |
| ०९/०१ | १०/०१ | ११/०१ | १२/०१ | १३/०१ | १४/०१ | १५/०१ | | १६/०१ | १७/०१ | १८/०१ | १९/०१ | २०/०१ |
| - | - | - | - | - | - | - | **पाऊस (मिमी)** | ० | ० | ० | ० | ० |
| - | - | - | - | - | - | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३१ | ३३ | ३४ | ३४ | ३२ |
| - | - | - | - | - | - | - | **किमान तापमान (अं.से)** | २० | २१ | २२ | २२ | २१ |
| - | - | - | - | - | - | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | निरभ्र | अंशत: ढगाळ | निरभ्र | निरभ्र | निरभ्र |
| - | - | - | - | - | - | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ६१ | ६१ | ६५ | ६१ | ५७ |
| - | - | - | - | - | - | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ३६ | ३३ | ३६ | ३९ | ३७ |
| - | - | - | - | - | - | - | **वाऱ्याचा वेग(किमी/तास)** | ५ | ३ | ३ | ३ | ४ |
| - | - | - | - | - | - | - | **वाऱ्याची दिशा** | ई.पू. | ई.पू. | ई.ऊ. | ई. | ई. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०२१ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | ३०९०.६ |

## हवामान सारांश /ईशारा

| | |
|---|---|
| **हवामान अंदाज** | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार रायगड जिल्हयात दिनांक १६ ते २० जानेवारी,२०२१ दरम्यान कमाल व किमान तापमानात १ ते २ अं.सें. इतकी घट संभवत असून आकाश निरभ्र राहील. |

## हवामान अंदाजावर आधारित कृषि सल्ला

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **आंबा** | मोहोर ते फळधारणा अवस्था | • **बोंगे फुटण्याच्या अवस्थेत** असलेल्या आंब्यावर **तुडतुड्यांचा, फुलकिडीचा आणि भुरी रोगाचा** प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने कीड व रोगाच्या नियंत्रणासाठी लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. + हेक्झाकोनाझोल ५% प्रवाही ५ मि.ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी<br>• **मोहोर फुटलेल्या** आंबा बागेमध्ये मोहोरावर **तुडतुडे, मिजमाशी इ.किडींचा तसेच भुरी रोगाचा** प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने **मोहोर फुलण्यापूर्वी** तुडतुडे आणि मिजमाशीच्या नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रीड १७.८ टक्के प्रवाही ३ मि.ली. प्रति १० लिटर पाणी आणि भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. (**टीप:** मोहोर नुकताच फुलत असताना ते फलधारणा होईपर्यंत किटकनाशकाची फवारणी टाळावी. फवारणी करणे गरजेची असल्यास बागेतील परागीकरण करणाऱ्या कीटकांवर होणारा परिणाम टाळण्यासाठी परागीकरणाचा कालावधी वगळून सकाळी ९.०० ते १२.०० किंवा सायंकाळी ३.०० वाजल्यानंतर फवारणी करावी.) या अगोदर फवारणी घेतली असल्यास किड व रोगाच्या प्रादुर्भावाकडे झाडाचे |

| | | |
|---|---|---|
| | | निरीक्षण करावे आणि प्रादुर्भाव दिसून आल्यास उपाय योजना कराव्यात.<br>• शिफारशीत दिलेली कीटकनाशकाची/बुरशीनाशकाची मात्रा ही मनुष्यबळाने वापरण्यात येणाऱ्या पंपासाठी आहे. |
| **काजू** | मोहोर ते फळधारणा | • **मोहोर अवस्थेत** असलेल्या काजू पिकावर ढेकण्या व फुलकिडींच्या वाढीसाठी हवामान अनुकूल दिसत असल्याने या किडींच्या बंदोबस्तासाठी मोहोर फुटण्याच्या वेळी प्रोफेनोफॉस ५० टक्के प्रवाही १० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी तसेच **फळधारणा** झालेल्या काजूच्या फळांवर ढेकण्या व फुलकिडीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने किडींच्या नियंत्रणासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. किंवा असिटामिप्रीड २० टक्के एसपी ५ ग्रॅम प्रति १० लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी. (सदर कीटकनाशकास लेबल क्लेम नाहीत). या अगोदर फवारणी घेतली असल्यास किड व रोगाच्या प्रादुर्भावाकडे झाडाचे निरीक्षण करावे आणि प्रादुर्भाव दिसून आल्यास उपाय योजना कराव्यात.<br>• **<u>टीप:</u>** ढेकण्या किड सकाळी आणि संध्याकाळच्या वेळेस सक्रीय असल्याने किडीच्या प्रभावी नियंत्रणासाठी फवारणी शक्यतो सकाळी १०.०० पूर्वी किंवा सायंकाळी ४.०० वाजल्यानंतर करावी. या अगोदर फवारणी घेतली असल्यास किड व रोगाच्या प्रादुर्भावाकडे झाडाचे निरीक्षण करावे आणि प्रादुर्भाव दिसून आल्यास उपाय योजना कराव्यात. |
| **नारळ** | फळधारणा | • नारळावर सोंड्या भुंग्याचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असते. या किडीच्या अळया माडाच्या खोडातील मऊ गाभा खाऊन खोड आतून पोखरून काढतात. अळया खोडाच्या आत असल्याने प्रादुर्भाव झालेल्या ठिकाणी बुंध्यावर छिद्रे दिसतात व त्यातून ताजा भुसा व तांबूस तपकिरी स्त्राव वाहताना दिसतो. किडीच्या नियंत्रणासाठी छिद्रातून शक्य असतील तेवढया अळया कोयतीच्या सहाय्याने काढून टाकाव्यात. माडाला कोणत्याही प्रकारे इजा करू नये आणि झाल्यास त्याला बोर्डोपेस्ट लावावी. तसेच सोंड्या भुंग्याच्या नियंत्रणासाठी बागेत प्रति एकरी १ गंध सापळा लावावा. गंध सापळयात असलेले आमिश (लुअर) साधारण दोन ते तीन महीन्यांपर्यत कार्यक्षम राहते. |
| **सुपारी** | फळधारणा | • सुपारीला खते द्यावयाची राहिली असल्यास खताची मात्रा देण्यात यावी. ३ वर्षावरील प्रत्येक झाडास १६० ग्रॅम युरिया आणि १२५ ग्रॅम म्युरेट ऑफ पोटश असा खताचा दुसरा हप्ता झाडाच्या बुंध्या पासून १ मीटर अंतरावर बांगडी पद्धतीने चरात देवून चर बुजवून घ्यावा. वर दिलेली खताची मात्रा तीन वर्षापेक्षा कमी वयाच्या लागवडीस देताना पहिल्या वर्षी १/३ पट आणि दुसऱ्या वर्षी २/३ पट या प्रमाणे देण्यात यावी.<br>• आर्द्रतेत घट संभवत असल्याने सुपारी बागेस ६ ते ८ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **उन्हाळी भात** | रोप अवस्था | • पुर्नलागवड करावयाच्या खाचरामध्ये चिखलणी करावी. चिखलणीच्या वेळेस एकरी ३५ कि.ग्रॅ. युरिया, १२५ कि.ग्रॅ. सिंगल सुपर फोस्फेट आणि ३४ कि.ग्रॅ. म्युरेट ऑफ पोटश खते मिसळावे. पुर्नलागवडीसाठी भाताची १२ ते १५ सें.मी. उंचीची पाच ते सहा पाने फुटलेली ३५ ते ४० दिवसांची रोपे वापरावीत. पुर्नलागवड २० X १५ सें.मी. अंतरावर करावी. लावणी सरळ आणि उथळ २.५ ते ३.५ सें.मी. खोल करावी. उथळ लावणी केल्याने फुटवे चांगले येतात. एका चुडामध्ये दोन ते तीन रोपे लावावीत.<br>• भात पुनर्लागवडीनंतर पहिल्या ३० दिवसांपर्यंत शेतात पाण्याची पातळी २.५ ते ५ सें. मी. ठेवावी. |
| **मधुमका** | वाढीची अवस्था | • मधुमक्यावर लष्करी अळीचा (फॉल आर्मीवर्म) प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असून किडीच्या प्रथमावस्थेतील अळया या पाने कुरतडतात तसेच पुढील अवस्थेतील अळया पानाच्या पोंग्यात राहून पाने खातात. परिणामी पण पूर्ण उघडल्यावर त्यात छिद्रे दिसून येतात. एका रोपामध्ये १ ते २ अळया असून शकतात. अळीची विष्ठा पानाच्या पोंग्यामध्ये दिसून येते. किडीच्या नियंत्रणासाठी क्लोरानट्रानिलीप्रोल १८.५ टक्के प्रवाही ४ मि.ली. किटकनाशकाची प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फवारणीचे द्रावण पोंग्यामध्ये पडेल असे पहावे.<br>• **<u>टीप</u>** : रासायनिक किटकनाशकाचा वापर जनावरांचे खाद्य म्हणून असलेल्या मक्यावर करून |

| | | |
|---|---|---|
| | | नये तसेच रासायनिक किटकनाशकाचा मक्याच्या फुलोरा अवस्थेत आणि कणसे धरण्याच्या अवस्थेत करू नये. |
| **वाल** | फुलोरा ते शेंगा अवस्था | • वाल पिक फुलोऱ्यात येण्याची व दाणे भरण्याची अवस्था ओलाव्यासाठी अति सवेंदनशील असल्याने वाल पिकास फुलोऱ्या येण्याच्या व दाणे भरण्याच्या अवस्थेत पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **पांढरा कांदा** | वाढीची अवस्था | • कांदा पिकामध्ये फुलकिडीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असून किडीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी क्विनोलफॉस २५ मिली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **कलिंगड** | फळधारणा | • फळधारणा अवस्थेत असलेल्या कलिंगड पिकाला ३ ते ४ दिवसांच्या अंतराने नियमित पाणी द्यावे. पाण्याच्या अनियमित पाळ्या दिल्यावर फळे तडकण्याची शक्यता असते.<br>• कलिंगडाच्या फळांचे सूर्यप्रकाशापासून बचाव करण्यासाठी फळे भाताच्या पेंढ्याने किंवा गवताने झाकून घ्यावीत.<br>• कलिंगड पिकामध्ये फळमाशीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने फळमाशीच्या नियंत्रणासाठी पिकामध्ये फुले येण्यास सुरुवात झाल्यापासून शेतामध्ये प्रती एकरी दोन 'क्यु ल्युर' रक्षक सापळे लावावेत. वेळोवेळी किडग्रस्त फळे गोळा करून नष्ट करावीत. |
| **कुकुटपालन** | - | • बर्ड फ्लू या विषाणूजन्य रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून कुकुटपालनाच्या शेड व आवारात १ टक्का सोडियम हायपोक्लोराईडचे द्रावण वापरून निर्जंतुकीकरण करून घ्यावे तसेच कुकुटपालनशेडमधील भिंतींना चुना लावावा. गादी पद्धतीने (डीप लिटर) पक्ष्यांचे संगोपन करत असलेल्या ठिकाणी गादी निर्जंतुकीकरणासाठी तसेच गादीतील ओलावा कमी करण्यासाठी २ टक्के चुना गादीत मिसळावा.<br>• पक्षी इतर वन्य पक्षांच्या संपर्कात येणार नाहीत याची दक्षता घ्यावी. पक्ष्यांना पिण्यासाठी स्वच्छ आणि निर्जंतुक केलेल्या पाण्याची व्यवस्था करावी. |

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.

अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा.